N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** अरमोरी **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0422 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/12/2021 15:19 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 30/11/2021

**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/12/2021

**Time From (वेळेपासून):** 16:28 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:30 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/12/2021 **Time (वेळ):** 13:30 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 029 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/12/2021 15:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, .5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** नगर परीषद,आरमोरी, आरमोरी, आरमोरी

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री मंगेश वसंत मने

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आरमोरी,आरमोरी,अरमोरी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आरमोरी,आरमोरी,अरमोरी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** दुकानदार

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री प्रदिप देवराम मेश्राम | | | 1. नगर परीषद, नगर परीषद आरमोरी , आरमोरी ,अरमोरी,गडचिरोली,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये चे 16 नोटा असे एकुण 8,000/ रुपये, दिनांक 01/12/2021 | 8,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 8,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 01/12/2021नांव:- कु. मंगेश वसंत मने, वय 31 वर्षे, जात -कुणबी (ओबीसी), धंदा मोबाईल दुकान, मु. पो. ता. आरमोरी, जि. गडचिरोली. मो.नं. 9420191781. मी दिनांक 30/11/2021 रोजी श्री सुरेंद्र गरड, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली कम्प आरमोरी यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. श्री सुरेंद्र गरड, पोलीस उप अधीक्षक यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी तक्रार कार्यालयीन लपटॉपवर नोंदवून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे. माझे वडीलांचे नावे सन 2020-21 मध्ये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नगर परिषद आरमोरी येथुन घरकुल मंजुर झाल्याने शासनाकडुन एकुण 2,50,000/- रुपये मंजुर झाले. त्यापैकी रुपये 40,000/- चा निधी माझे वडीलांचे खात्यावर जमा झाले. त्या निधीमधुन मी घराचा पाया बांधला, त्यानंतर पुन्हा 40,000/- रुपये जमा झाल्याने सज्जाचे बांधकाम केले. त्यानंतर 20,000/- रु जमा झाल्याने स्लबचे बांधकाम केले. त्यानंतर परत 60,000/- रुपये खात्यात जमा झाल्याने घराचे प्लॉस्टरचे काम केले. अंदाजे एक महीण्यापुर्वी नगर परिषद आरमोरी येथील श्री मेश्राम इंजिनियर साहेब माझ्या दुकानात आले व त्यांनी माझा काम केला नाहीस म्हणुन 1,800/- रु किमतीचा एक साधा मोबाईल उधारीवर घेवुन गेले. त्यानंतर पंधरा दिवसापुर्वी वडीलांचे खात्यामध्ये 60,000/- रु. जमा झाल्याने घराचे फिनीशिंगचे काम पुर्ण केले व उर्वरीत 30,000 /- रु मिळणे बाकी असल्याने मी चार दिवसापुर्वी नगर परिषद आरमोरी येथे जावुन श्री मेश्राम इंजिनियर साहेब यांना भेटलो असता त्यांनी तुमचे घरकुलाचे एकुण 2,20,000/- रु तुमच्या खात्यावर जमा केलेले आहेत, त्याचे मला 10,000/- रु. दयावे लागेल, नाहीतर तुमचे उर्वरीत 30,000/- रु. लवकर जमा करणार नाही. असे म्हणाले. त्यावर मी त्यांना भितीपोटी घाबरुन विनंती केली की, साहेब आता तर माझे कडे एवढे पैसे नाहीत, मी पैशाची व्यवस्था करुन नंतर आपणास येवून भेटतो. असे म्हणालो त्यावर त्यांनी ठिक आहे म्हणून मला पैशाची मागणी केली आहे. श्री मेश्राम, इंजिनिअर, नगर परिषद, आरमोरी, जि. गडचिरोली यांनी माझे वडीलांचे नावे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजुर झालेल्या घरकुलाचे रक्कम जमा केल्याचा मोबदला म्हणुन 10,000/-रु. लाचेची मागणी केलेली आहे. श्री मेश्राम, इंजिनिअर, नगर परिषद, आरमोरी, जि. गडचिरोली यांना 10,000/-रु. लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी 10,000/- रु. घेऊन आपले कार्यालया मार्फत कार्यवाही होणे करीता स्वेच्छेने लाच लुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली कम्प आरमोरी येथे तक्रार देण्यास आलो. श्री सुरेंद्र गरड, पोलीस उपअधिक्षक यांनी 2 शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री सुरेंद्र गरड साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझी लपटापवर टंकलिखीत केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी सुद्धा स्वाक्षरी केली. पोलीस उपअधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी व्हाईस रेकॉर्डर

कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाशण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 10,000/- (रू. 500/- दराच्या 20 चलनी नोटा) घेतले. त्यावेळी सदरच्या नोटाचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेस अँथ्रसिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत. पोलीस उप अधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचे सह गैरअर्जदार हे मौजा आरमोरी नगर परिशद येथे जाण्यास रवाना केले. गैरअर्जदार यांची नगर परिषद आरमोरी येथे भेट झाली व त्यांनी मला माझे वडीलांचे नावे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजुर झालेल्या घरकुलाची रक्कम जमा केल्याचा मोबदला म्हणुन रु. 10,000/- रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. 8,000/- लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविली. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह पोलीस उपअधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांचेकडे परत गेलो असता, पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. पोलीस उप अधिक्षक श्री गरड यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण गै.अ. श्री मेश्राम इंजिनियर यांनी मला माझे वडीलांचे नावे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजुर झालेल्या घरकुलाची रक्कम जमा केल्याचा मोबदला म्हणुन रु. 10,000/- रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. 8,000/- लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून गै.अ. श्री मेश्राम इंजिनियर यांचेविरूद्ध दिनांक 01.12.2021 रोजी सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी यांनी पडताळणी व सापळा स्थगीती पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत. आज दि. 01/12/2021 रोजी लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील तपासी अधिकारी श्री सुरेंद्र गरड, शासकिय पंच व स्टॉफसह शासकिय वाहनाने मौजा आरमोरी येथील वनविभागाच्या नर्सरी मध्ये पोहचुन माझे मोबाईल फोनवर संपर्क करुन मला तिथे बोलावून घेतले. मी त्यांचे समक्ष पोहचलो त्यावेळी मला पंचासमक्ष अँथ्रसिन पावडर लावलेल्या नोटांचा सिलबंद लिफापा फाडून त्यातील 2,000/- रु. मला वेळीच परत केले व रु. 8,000/- (500/-रु. दराच्या 16 नोटा) लाचेची रक्कम माझे फुलपंटच्या समोरील डावे बाजुचे खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर आपल्याजवळील रुमालाने चेहरा पुसावा असा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारण्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. पोलीस उप अधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह नगर परिषद आरमोरी येथे श्री मेश्राम, इंजिनिअर यांचेकडे जाण्यास रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. त्यानंतर मी व पंच क्रं. 1 नगर परिशद कार्यालयात गेलो असता, त्याठिकाणी श्री मेश्राम, इंजिनिअर आपल्या कक्षात हजर होते. त्यांनी मला लाच रकमेची मागणी केल्याने मी अँथ्रसिन पावडर लावलेल्या रू. 8,000/- लाचेची रक्कम माझे फुलपंटच्या समोरील डावे बाजुचे खिश्यातुन काढुन श्री मेश्राम, इंजिनिअर यांना दिल्या असता, त्यांनी लाच रक्कम रू. 8,000/- आपल्या उजव्या हाताने घेवुन त्यांचे अंगातील फुलपन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिश्यात ठेवली. त्यावेळी मी पंच क्रं. 1 सोबत दर्षनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे जवळील रुमालाने चेहरा पुसुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने श्री मेश्राम, इंजिनिअर यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उप अधीक्षक सुरेंद्र गरड यांनी पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत. तरी लोकसेवक श्री प्रदीप देवराम मेश्राम, वय 30 वर्षे, अभियंता (कत्राटी), नगर परिषद आरमोरी, ता. आरमोरी, जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून मला माझे वडीलांचे नावे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मंजुर झालेल्या घरकुलाची रक्कम जमा केल्याचा मोबदला म्हणुन 10,000/- रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. 8,000/- लाच रक्कम माझेकडुन पंचासमक्ष स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशिर फिर्याद आहे.

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** surendra jagannath garad
**Rank (पद):** I (Inspector)
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name** (नाव): MANOJ KRISHNAJI KALBANDE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN75050

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)